# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक १३/०४/२०२४ (शनिवार) सायंकाळ

---

### अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतूक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक १२/०४/२०२४ रोजी ०६.४० वा. दरम्यान पोलीस स्टेशन केळवद येथील स्टाफ पोस्टे केळवद परीसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, एक इसम त्याचे ताब्यातील मोटारसायकल वर एका पांढऱ्या रंगाच्या बोरीत गावठी मोहाफुल दारु घेउन तिडंगी कडुन सावनेर कडे जात आहे. अशा मिळालेल्या खबरे वरुन मौजा तिडंगी शिवारातील ग्रीन ग्रोस फॉर्म हाउस जवळ पोहचून तिडंगी कडुन तेलगावकडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता पल्सर मोटरसायकल क्र. एम. एच–४०/सी. जे–८५२७ चा चालक **आरोपी नामे– अमित चंद्रपाल राजपुत, वय ३४ वर्ष, रा. पारधीबेडा तिडंगी तह. कळमेश्वर** हा त्याचे गाडीवर समोर ठेवलेल्या पांढऱ्या रंगाच्या बोरीमध्ये अवैदयरित्या विनापरवाना एक काळया रंगाच्या रबरी टयुबमध्ये मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करतांनी मिळून आल्याने आरोपीचे ताब्यातून १) एक वन प्लस कंपनीचा ॲन्ड्रॉईट मोबाईल किंमती १५,०००/–रू. २) एका पांढऱ्या रंगाच्या बोरीत काळया रंगाच्या रबरी टयुब मध्ये ४० लिटर मोहाफुल गावठी दारू किंमती २,०००/– रू. ३) एक निळया रंगाची पल्सर मोटर सायकल क्र. एम. एच.– ४०/सी जे– ८५२७ किंमती १००००/–रू. असा एकुण ११७,०००,००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५ (अ) म.दा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे केळवद येथील ठाणेदार राकेश साखरकर, सफौ. संदिप नागरे, पोशि धोंडुतात्या देवकते, चालक सफौ गुणेश्वर डाखोळे यांनी पार पाडली.

## पो.स्टे. अरोली हद्दीमधील मौजा निमखेडा येथील सट्टापट्टी अड्डयावर धाड

## —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक १२/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना गोपनीय माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील **आरोपी धिरज सिंगराज बारमाटे, वय ३६ वर्ष, रा. अशोक नगर कन्हान ता. पारशिवनी** हा निमखेडा मेन चौकातील एका बंद पानठेल्याचे मागे खुल्या जागेत त्याचे जवळील मोबाईलचे लाईटचे उजेडात लोकांकडुन मटक्याचे आकडयावर पैसे घेवुन जुगार खेळवत आहे. अशी माहिती प्राप्त झाले वरून सदर स्टाफने रेड केली असता **आरोपी नामे— धिरज सिंगराज बारमाटे, वय ३६ वर्ष, रा. अशोक नगर कन्हान ता. पारशिवनी** हा जुगार खेळतांनी मिळुन आला. आरोपीस ताब्यात घेवुन आरोपीची अंगझडती घेतली असता १) पेन व कार्बनचे सहायाने मटक्याचे आकडे लिहिलेले दोन कागदी पट्टया २) एक कार्बनची पट्टी ३) एक निळया शाईचा पेन कि. ०५/— रू. ४) लोकांकडुन जुगाराकरीता घेतलेल्या नगदी ५७०/— रू. ५) एक काळया रंगाचा realme कंपनीचा चालू स्थितीतील मोबाईल किंमती ५,०००/— रू चा मुद्देमाल असा एकुण ५,५७५/— रू. चा मुद्देमाल मिळुन आला.

वरील मुद्देमाल जप्त करून आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे अरोली येथील ठाणेदार श्री. सपोनि निशांत फुलेकर, पोहवा राजेंद्र पुडके, चापोशि निशांत देवांगन यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**